**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक ०१ नोव्हेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **मतचोरी आणि मतदार याद्यांमधे घोळ असल्याचा आरोप करत महाविकास आघाडीचा मुंबईत मोर्चा.**
2. **केंद्र सरकारच्या हमीभाव योजनेंतर्गत मूग, उडीद आणि सोयाबीन खरेदीला राज्यात येत्या १५ नोव्हेंबरपासून सुरुवात होणार.**
3. **नागपूर स्किल सेंटर केवळ नागपुरातीलच नाही तर विदर्भातील लाखो युवकांच्या रोजगाराचे स्वप्न साकार करेल - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच प्रतिपादन.**
4. **अमरावतीत वन्यजीव आणि पर्यावरण संवर्धन संस्थेच्या वतीने 3 रे अखिल भारतीय व 38 वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन.**

-----------------------------------------

सत्याचा मोर्चा

मतदार याद्यांमधील घोळ, मतचोरी या विरोधात महाविकास आघाडीतील घटक पक्ष आणि मनसे यांच्या वतीन मुंबईत 'सत्याचा मोर्चा' काढण्यात आला होता. हा मोर्चा फॅशन स्ट्रीट, मेट्रो सिनेमामार्गे मुंबई महापालिकेच्या प्रवेशद्वारावर येऊन थांबला. या मोर्चात जेष्ठ नेते शरद पवार यांच्यासह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, मनसेचे पक्षप्रमुख राज ठाकरे, सुप्रिया सुळे, सतेज पाटील, विजय वडेट्टीवार, आदित्य ठाकरे यांच्यासह माकप, भाकप, शेकाप, आणि इतर संघटना सहभागी झाल्या होत्या. मनसेचे पक्षप्रमुख राज ठाकरे यांनी निवडणुकीतील दुबार मतदारांची यादीच एका कापडात सभास्थळी आणून या सदोष याद्या ठीक केल्याशिवाय निवडणूका न घेण्याची भूमिका मांडली.

***(होल्ड बाईट - राज ठाकरे 34 सेकंद)***

***मी आज तुमच्यासाठी पुरावादेखील आणला या सगळ्या दुबार मतदारांचा. काढ ते कापड हे सगळं दुबार मतदार आहेत हे एवढे सगळे दुबार मतदार आहेत हे मी तुम्हाला आता जेवढे फक्त मतदार संघ सांगितले तेवढ्यातले फक्त दुबार मतदार आहेत ते म्हणजे तुम्हाला कल्पना येईल महाराष्ट्रामध्ये काय प्रकारचा गोंधळ आहे***

***तो आणि एवढे पुरावे दिल्यानंतर देखील हट्ट सुरु आहे की नाही नाही कोर्टाने सांगितले आहे, जानेवारीत निवडणुका घ्या कश्या घ्या, का घ्या, कोणाला आहे घाई पाच वर्षात निवडणुका घेतलय नाही आहेत पाच वर्ष अजून एक वर्ष गेला तर काय फरक पडणार आहे.***

याप्रसंगी माजी मुख्यमंत्री आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी ही एकजूट लोकशाही माणना-या पक्षाची आहे अस सांगितल.

***(होल्ड बाईट -उदधव ठाकरे 18 सेकंद)***

***ही विरोधी पक्षांची एकजूट नाही ही लोकशाहीचा प्रतिनिधित्व आणि लोकशाहीचं नेतृत्व करणारा सर्व राजकीय पक्षांची एकजूट आहे आणि मत चोरी करणार्यांना सांगतो की आज नुसती ठिणगी बघता आहेत या ठिणगीचा वणवा कधी होऊ शकेल एवढे लक्षात ठेवा.***

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी सांगितल की, आजच्या मोर्चाने संयुक्त महाराष्ट्र चळवळीची आठवण करुन दिली. त्यानंतर आज तुम्ही सगळ्यांनी जबरदस्त एकजूट दाखवली आहे. आता लोकशाही, संविधानाने दिलेला अधिकार जतन करण्याची वेळ आली आली. कारण सरकारतर्फे सत्तेचा गैरवापर केला जात असल्याचा आरोप पवार यांनी केला.सदोष मतदार याद्यांची दुरुस्ती झाल्याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका घेतल्या जाऊ नयेत अशी महाविकास आघाडीची मागणी आहे. दरम्यान हा मोर्चा सत्याचा नव्हे तर सत्तेचा आहे अशी टीका भाजपानं केली आहे.

-----------------------------------------

आधारभूत किंमत खरेदी

केंद्र सरकारच्या किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत मूग, उडीद आणि सोयाबीन पिकांच्या खरेदीला येत्या १५ नोव्हेंबरपासून सुरुवात होणार असून त्यासाठी शेतकऱ्यांना ॲपद्वारे किंवा खरेदी केंद्रांवर ऑनलाईन नोंदणी करता येईल. या नोंदणीला 30 ऑक्टोबरपासून सुरुवात झाली आहे तर अंतिम मुदत ३१ डिसेंबर आहे. खरेदीचा कालावधी १५ नोव्हेंबरपासून पुढील ९० दिवसांसाठी असेल. शेतकऱ्यांनी नजीकच्या खरेदी केंद्रावर नोंदणी करण्यासाठी कागदपत्रांसह अर्ज करावा आणि नाफेडच्या धान्य खरेदी योजनेचा लाभ घ्यावा, असं आवाहन पणन अधिकाऱ्यांनी केलं आहे.

-----------------------------------------

व्यावसायिक गॅस

देशभरात व्यावसायिक वापराच्या गॅसच्या किंमतीत आजपासून घट झाली आहे. घरगुती वापराच्या १४ किलो २०० ग्रॅम वजनाच्या एल पी जी सिलेंडरच्या किंमतीत मात्र कोणताही बदल झालेला नाही. व्यावसायिक वापराच्या १९ किलो वजनाच्या गॅस सिलेंडरच्या किंमतीत साडे चार ते साडे सहा रुपयांपर्यंत घट झाली असून यानुसार आता दिल्लीत या सिलेंडरची किंमत १ हजार ५९० रुपये ५० पैसे असेल, मुंबईत हा सिलेंडर १ हजार ५४२ रुपयांना मिळेल. कोलकाता इथं सर्वाधिक साडे सहा रुपयांची घट झाली असून तिथं सिलेंडरची किंमत १ हजार ६९४ रुपये तर चेन्नई मध्ये १ हजार ७५० रुपये असेल.

-----------------------------------------

नितीन गडकरी

नागपूर स्किल सेंटर केवळ नागपुरातीलच नाही तर विदर्भातील लाखो युवकांच्या रोजगाराचे स्वप्न साकार करेल आणि विदर्भाच्या प्रगतीला गती देईल, असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं. असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट (एआयडी) चे विदर्भ ग्लोबल फाउंडेशन, नागपूर महानगरपालिका आणि टाटा स्ट्राईव्ह यांच्या संयुक्त विद्यमाने “नागपूर स्किल सेंटर” या कौशल्य विकास उपक्रमाचे लोकार्पण आज केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते संपन्न झालं. कार्यक्रमाची सुरुवात “नागपूर स्किल सेंटर”विषयी माहितीपटाच्या प्रक्षेपणाने झाली. यावेळी मनपा, एआयडी आणि टाटा स्ट्राईव्ह यांच्यात सामंजस्य करार सुद्धा करण्यात आला. या करारांवर डॉ.अभिजीत वंजारी, अमेय वंजारी आणि आशिष काळे यांनी स्वाक्षरी केली. नितीन गडकरी म्हणाले,कि “विदर्भातील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी एआयडी व टाटा स्ट्राईव्ह यांच्यात झालेला करार कौतुकास्पद आहे. पण केवळ शहराला स्मार्ट करून होणार नाही तर ग्रामीण भागातील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे गरजेचे आहे. स्मार्ट शहरांसोबत स्मार्ट गावेही व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त करताना नितीन गडकरी यांनी पुढील पाच वर्षात विदर्भातील प्रत्येक विधानसभा क्षेत्रात 5 हजार युवकांना देण्याचे उद्दिष्ट समोर ठेवावे असे ते म्हणाले. “एआयडी, टीसीआयटी आणि मनपा या तीन संस्थांच्या सहकार्याने नागपूर स्किल सेंटरची स्थापना होत आहे. पूर्व नागपुरातील पारडी येथे ३० हजार चौरस फूट क्षेत्रावर हे केंद्र उभे राहिले आहे. पुढील महिन्याभरात सर्व प्रक्रिया पूर्ण होऊन जानेवारीपासून अभ्यासक्रम सुरू होतील,” अशी ग्वाही मनपा आयुक्त डॉ.अभिजीत चौधरी यांनी दिली.

-----------------------------------------

नक्षल संदेश

नक्षलवाद्यांच्या केंद्रीय समितीने शस्त्रबंदीचा प्रस्ताव फेटाळल्यानंतर, जहाल माओवादी नेता मल्लोजुला वेणुगोपाल ऊर्फ भूपती (सोनू) याने आपल्या ६० सहकाऱ्यांसह १५ ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आत्मसमर्पण केले होते. त्यानंतर केंद्रीय समितीने भूपतीला 'गद्दार' ठरवून त्याच्यावर गंभीर आरोपांची सरबत्ती केली. या सर्व आरोपांना प्रत्युत्तर देत, भूपतीने आज १ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध केलेल्या व्हिडिओ संदेशात सर्व आरोप फेटाळले असून, "आता परिस्थिती बदलली आहे, शस्त्रे सोडून समाजमुखी वाटचाल सुरू करा," असे आवाहन नक्षल चळवळीतील सक्रिय कार्यकर्त्यांना केले आहे.

***(होल्ड बाईट - भूपती 25 सेकंद)***

***देश के कोने कोने में काम कर रहे हैं हमारे साथियों से मेरी अनुरोध ये है कि आप तमाम लोग हथियारबंद संघर्ष पर हम आगे नहीं बढ़ेंगे करके हम जो समझे है आपके सामने रख रहे हैं। इस पर आप लोग भी निर्णय लेकर हथियार छोड़कर जनता के बीच में आकर काम करने के लिये मैं विनती कर रहा हूँ।***

भूपतीने आपल्या संदेशात स्पष्ट केले की, "१६ सप्टेंबर रोजी शस्त्रबंदीचा विचार मांडला आणि बदलत्या वास्तवाचा स्वीकार करत आत्मसमर्पणाचा निर्णय घेतला. जनतेच्या विकासासाठी आता कायद्याच्या चौकटीत राहून काम करण्याचा निर्धार आम्ही केला आहे.

----------------------------------------

पक्षिमित्र संमेलन

अमरावती इथं सुरू असलेल्या ३ऱ्या अखिल भारतीय आणि ३८व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनात नैसर्गिक अधिवास नष्ट होत असल्यानं पक्षांच्या विविधतेला धोका निर्माण झाला असून अधिवास संवर्धनाची गरज आहे, असे मत मित्रा राज्य नियोजन संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण परदेशी यांनी व्यक्त केलं. ते ऑनलाईन पद्धतीने संमेलनाध्यक्ष म्हणून बोलत होते. त्यांनी पक्षी संवर्धनासाठी लोकसहभाग आणि जनजागृतीचे महत्त्व अधोरेखित केले.राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक एम.श्रीनिवास रेड्डी यांच्या हस्ते संमेलनाचं उद्घाटन झालं. यावेळी महाराष्ट्र पक्षी मित्र संघटनेचे अध्यक्ष जयंत वडदकर यांनी या द्वि दिवसीय संमेलनाविषयी माहिती दिली.

***(होल्ड बाईट- जयंत वडदकर १८ सेकंद)***

***या संमेलन अंतर्गत दोन दिवस वेगवेगळे चर्चासत्र होणार आहेत आणि वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन सुद्धा करण्यात आले होते , तर या दोन दिवसांच्या संमेलनामध्ये त्या पक्षांच्या समस्यांवर पक्ष्यांच्या जैवविविधतेवर पक्षाच्या विविधतेवर चर्चा होतील त्याचा अनेक अभ्यासक आणि अमरावतीतील विद्यार्थी लाभ घेत आहेत. ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे.***

यावेळी विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली असून, देशभरातील सुमारे ३०० पक्षीमित्र, संशोधक आणि निसर्गप्रेमी सहभागी झाले. संमेलनात पक्षी संवर्धनातील उल्लेखनीय कार्यासाठी विविध पुरस्कार प्रदान करण्यात आले आणि पक्ष्यांच्या छायाचित्रांचे प्रदर्शनही भरविण्यात आलं .या संमेलनाचा समारोप उद्या होणार आहे.

-----------------------------------------

हवामान

हवामान! नागपूर सह भंडारा, गोंदिया, वर्धा या जिल्ह्यांमध्ये आज आणि उद्या हवामान सामान्य राहणार असल्याचा अंदाज असून चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ, अकोला, बुलढाणा या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवली आहे. दरम्यान, भंडारा जिल्ह्यातील अवकाळी पावसामुळे धानपिकाच मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची पाहणी दौऱ्यावर आलेल्या पालकमंत्री पंकज भोयर आणि अधिकाऱ्यांनी केली. प्रशासनाला तातडीन सर्वे करून पंचनामे पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून शेतकऱ्यांना त्वरित मदत मिळावी, यासाठी प्रयत्न सुरू आहेत असे ते म्हणाले.

-----------------------------------------

आयसीसी महिला विश्वचषक

आयसीसी महिला विश्वचषक स्पर्धेत भारताची अंतिम लढत दक्षिण आफ्रिकेशी होणार आहे. हा सामना नवी मुंबईच्या डी वाय पाटील मैदानावर होणार आहे. उद्या सकाळी साडेनऊ वाजता खेळ सुरु होईल.

-----------------------------------------

साहित्य संमेलन

विदर्भ साहित्य संघ शाखा जांब आणि ईश्वर देशमुख फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमान आयोजित 69 व्या विदर्भ साहित्य संमेलनाला यवतमाळ येथे आज ग्रंथ दिंडीन सुरुवात झाली.

-----------------------------------------